# पुणे महानगरपालिका

## जाहीर आवाहन

## स्वच्छ सर्वेक्षण २०२१ - Citizen Engagement Programme Competition

| क्र. | स्पर्धेचे नाव | गट | नियम | क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | जिंगल स्पर्धा | खुला गट | १. जिंगल जास्तीत जास्त २ मिनिट व कमीत कमी १ मिनिट वेळेची असावी.<br>२. जिंगल बनविताना मोबाईल ॲपचा वापर करण्यात यावा.<br>३. जिंगलमध्ये संगीताबरोबर शब्दांकन असणे आवश्यक आहे. | प्रथम - ७,०००/-<br>द्वितीय - ५०००/-<br>तृतीय- ३०००/- |
| २. | शॉर्ट मुव्हीस स्पर्धा | खुला गट | १. शॉर्ट मुव्हीस जास्तीत जास्त ५ मिनिट व कमीत कमी २ मिनिट वेळेची असावी.<br>२. शॉर्ट मुव्ही बनविताना मोबाईलद्वारे शुट करण्यात यावे.<br>३. शॉर्ट मुव्हीमध्ये शहराचे नाव, स्वत:चे नाव, महानगरपालिका कोड ८०२८१४ दर्शविण्यात यावे. | प्रथम - १०,०००/-<br>द्वितीय - ७०००/-<br>तृतीय- ५०००/- |
| ३. | पोस्टर्स ड्रॉइंग स्पर्धा | खुला गट | १. पोस्टर्स करीता फुल ॲम्पीयर कागद/ कार्डबोर्ड वापरावे.<br>२. चित्र रंगविण्यासाठी माध्यम (वॉटर/पोस्टर, ऑईल पेस्टल/ब्लॅकपेन इत्यादी साहित्य) वापरावे.<br>३. पोस्टर्सचे पाठीमागील बाजूस शहराचे नाव, स्वत:चे नाव, मोबाईल क्र. पत्ता व महानगरपालिका कोड ८०२८१४ नमूद करावे. | प्रथम - ७,०००/-<br>द्वितीय - ५०००/-<br>तृतीय- ३०००/- |
| ४. | म्युरल्स स्पर्धा | खुला गट | १. म्युरल्स हे इको फ्रेंडली असावे यासाठी माध्यम (कागद,माती, लाकूड, साबण, कार्डबोर्ड इ.साहित्य ) वापरावे<br>२. म्युरल्सची साईज कमीत कमी २ * २ फुट असावी व जास्तीत जास्त ६ * ६ फुट असावी. | प्रथम - १०,०००/-<br>द्वितीय - ७०००/-<br>तृतीय- ५०००/- |
| ५. | स्ट्रीट प्ले स्पर्धा | खुला गट | १. स्ट्रीट प्लेमध्ये कमीत कमी ५ सदस्य असावे.<br>२. स्ट्रीट प्लेद्वारे स्वच्छतेबाबतची जनजागृती शहरातील ज्या भागात केली जाईल तेथील व्हिडिओ चित्रीकरण मोबाईलद्वारे करणेत यावे. जास्तीत जास्त ५ मि. व कमीत कमी ३ मि. पथनाट्य असावे.<br>३. व्हिडिओ मध्ये शहराचे नाव, पथनाट्य ग्रुपचे नाव, महानगरपालिका कोड ८०२८१४ दर्शविण्यात यावे. | प्रथम - १०,०००/-<br>द्वितीय - ७०००/-<br>तृतीय- ५०००/- |

सर्व स्पर्धांकरीता सर्वसाधारण नियम व सूचना -

१. सदर स्पर्धांचे कामकाज करताना सर्व स्पर्धकांनी कोविड-१९ चे सर्व नियम पाळणे बंधनकारक आहे.

२. सदर स्पर्धांकरीता प्रवेश विनामुल्य राहील. सर्व स्पर्धेचे विषय हे Air quality improvement (हवेतील गुणवत्ता सुधार), स्वच्छ सर्वेक्षण,स्वच्छता विषयक जनजागृती, कचरा वर्गीकरण, प्लास्टिक बंदी, हागणदारीमुक्त शहर व पार्यावरण जनजागृती इ.शहतील.

३. सर्व स्पर्धांकरीता आवश्यक असणारे साहित्य स्पर्धकांचे राहील.

४. सर्व स्पर्धेकरीता महानगरपालिका जाहीर करेल तो गुगल फॉर्म भरून स्पर्धेत प्रवेश घेणे अनिवार्य राहील. गुगल फॉर्ममध्ये विचारण्यात आलेली माहिती भरून त्यावरच आपले स्पर्धा साहित्य, व्हिडिओ, पोस्टर्स, म्युरल्सचे फोटो अपलोड करावयाचे आहेत. ही सर्व माहिती पूर्ण असलेले फॉर्म्स म्हणजेच स्पर्धकांची अंतिम प्रवेशिका समजली जाईल. गुगल फॉर्म साठी लिंक (link- http://shorturl.at/cvxKV )

५. म्युरल्स स्पर्धेकरीता गुगल फॉर्म भरून त्यावर म्युरल्सचे फोटो अपलोड करावेत. अंतिम परीक्षणाच्या वेळी महानगरपालिका सर्व स्पर्धकांसाठी ठिकाण निश्चित करून देईल व त्याठीकाणी सर्व स्पर्धकांनी म्युरल्स परीक्षणासाठी घेऊन येणे आवश्यक असेल.

६. सर्व स्पर्धांचा कालावधी हा दि. २६ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर २०२० असा राहील.

७. स्पर्धेतील प्रत्येक गटातील प्रथम येणा-या तीन क्रमांकास रोख बक्षिसे देण्यात येतील.

८. महानगरपालिकेने नेमलेल्या परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

९. स्पर्धेत जमा होणारे सर्व साहित्य जिंगल्स, मुव्ही, पोस्टर्स, पथनाट्य शुटींग यावर महानगरपालिकेचा अधिकार राहील. या साहित्याचा वापर महानगरपालिका शहरात जनजागृती करण्यासाठी करेल.

तरी शहरातील सर्व नागरिकांनी या स्पर्धेत सहभागी होवून स्वच्छता विषयक जनजागृती मध्ये आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन करणेत येत आहे.

22/10/20

(माधव जगताप)
महापालिका सहाय्यक आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका

(विलास कानडे)
सह महापालिका आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन
पुणे महानगरपालिका